**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**कारागृह व सुधारसेवा विभाग**

**सुधारणा व पुनर्वसन**
**फोन क्र : (०२०) २६१२३५६३**
Email-igoffice.ddo-mh@gov.in

**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,**
**कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,पुणे-१**

---

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे/ई-मेलसंदेश**

जा.क्र.लेखा/रा.वा.क्रि.स्पर्धा/२०२५-२०२६/2012/२६,कक्ष-५,पुणे-१दिनांक- 11 /०३/२०२६.

**विषयः**-महाराष्ट्र राज्य कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे करीता सन-२०२५-२०२६ राज्यस्तरीय वार्षिक क्रिडा स्पर्धा आयोजित करणेबाबत.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या **सन-२०२५-२०२६ च्या राज्यस्तरीय वार्षिक क्रिडा स्पर्धा या दिनांक ०७/०४/२०२६ ते दिनांक १०/०४/२०२६ या कालावधीत दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे येथील मैदानावर घेण्याचे आयोजित आहे.**

या करिता प्रत्येक विभागाचे ७५ते ८० खेळांडूचा संघ व सदर संघामध्ये कमीत-कमी २० व जास्तीत जास्त २५ महिला खेळाडूंचा समावेश असणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रत्येक विभागा कडून विभागीय **क्रीडा** स्पर्धेत नैपुण्य दाखविलेल्या खेळांडूची नावे तसेच संघनायक व संघव्यवस्थापक यांची अंतिम यादी (सोमवार) दिनांक-३०/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजे पर्यत परस्पर प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे-६ यांना ई-मेल व्दारे पाठविण्यात यावी व त्याची प्रत मुख्यालयास सादर करावी.

सदर **क्रीडा** स्पर्धे मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या खेळांची यादी व महत्वाच्या मार्गदर्शक सूचना या पत्रा सोबत जोडण्यात येतआहे. विभागीय संघाचे व्यवस्थापक व सर्व खेळाडूना दिनांक-०६/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजे पर्यंत दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे-६ येथे हजर राहतील अशा बेताने कार्यमुक्त करण्यात यावे.

राज्यस्तरीय **क्रीडा** स्पर्धा दिनांक-०७/०४/२०२६ ते दिनांक-१०/०४/२०२६ या कालावधीत होणार आहेत.सदर **क्रीडा** स्पर्धा या दिनांक ०७/०४/२०२६ रोजी सुरु होणार असुन स्पर्धेचे उदघाटन मा.अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे हे दिनांक-०७/०४/२०२६ रोजी सायंकाळी-५.०० वाजता करणार आहेत.तसेच **क्रीडा** स्पर्धेचा बक्षिस समारंभ विशेष अतिथीचे उपस्थितीत दिनांक-१०/०४/२०२६ रोजी सांयकाळी ४.३० वाजता होणारआहे.

राज्यस्तरीय वार्षिक **क्रीडा** स्पर्धे साठी,निवड केलेल्या खेळाडूं अभावी कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेस बाधा येणार नाही व प्रशासनास अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी व तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग,येरवडा,पुणे-६,प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे-६,अधीक्षक,येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे-६ व अधीक्षक,येरवडा खुले जिल्हा कारागृह,पुणे ६यांनी राज्यस्तरीय वार्षिक **क्रीडा** स्पर्धा पारपाडण्यासाठी **(१)**संयोजन समिती **(२)क्रीडां**गण समिती **(३)**निवासस्थान समिती **(४)**भोजन समिती **(५)** बक्षिस/निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्र समिती **(६)** अभिलेख समिती **(७)**लेखा समिती **(८)**विद्युत समिती **(९)** वैद्यकीय समिती व **(१०)**नियंत्रण कक्ष समिती अशा समित्या त्यांचे स्तरावर स्थापन करुन राज्यस्तरीय वाषिक **क्रीडा** स्पर्धा पार पाडण्यासाठी कार्यवाही करावी.

राज्यस्तरीय वार्षिक **क्रीडा** स्पर्धा पार पाडताना खेळाडूंना उन्हापासून किंवा इतर बाबीं पासून त्रास होणार नाही याची दक्षता समितीतील पदाधिकारी यांनी घ्यावी तसेच राज्यस्तरीय वार्षिक **क्रीडा** स्पर्धे करीता पोलीस बॅन्ड पथक उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे-६ यांची राहील.

राज्यस्तरीय वार्षिक **क्रीडा** स्पर्धे मध्ये शिस्तीचे पालन करणे हे प्रत्येक खेळाडू चे आद्य कर्तव्य आहे.मैदानावर पंचा सोबत कोणताही खेळाडु उध्दटपणे वागणार नाही.अश ाप्रकारचे गैरवर्तन केल्यास संबंधीत खेळाडू, संघनायक व संघव्यवस्थापक यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची योग्यती कारवाई करण्यांत ायेईल याची सर्व खेळाडुंना लेखी समज देण्यात यावी.

**(मा.अ.पो.म.सं.म.का.सु से,पुणे यांचे आदेशान्वये)**

**(योगेश देसाई)**
विशेष कारागृह महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

**प्रति,**

**१**.कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग,येरवडा,पुणे-**०६**
**२**.प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविदयालय,येरवडा,पुणे-**०६**
**३**.अधीक्षक,येरवडा मध्यवर्ती कारागृह**,**येरवडा,पुणे-**०६**
४.अधीक्षक,येरवडा खुले जिल्हा कारागृह,येरवडा,पुणे-**०६**

**प्रत पुढील कार्यवाहीसाठी-**

**१** .कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)
२.अधीक्षक ,मध्यवर्ती/ जिल्हा कारागृह (सर्व)
३.प्राचार्य, किशोर सुधारालय, नाशिक
४.अधीक्षक ,खुले कारागृह (सर्व)
५.अधीक्षक, रत्नागिरी विशेष कारागृह/स्वतंत्रपुर खुली वसाहत आटपाडी
७.वरिष्ठ प्रशासन अधिकारी / स्वीय सहाय्यक, अपर पोलीस महासंचालनालय व कारागृह महानिरीक्षणालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१
८.कक्ष अधिकारी कक्ष-13 (ई-सेल) अ पो म व का व सु से यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे-01 ई-मेल व कारागृह संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी.

**राज्यस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धा सन-२०२५-२०२६ करीता महत्वाच्या मार्गदर्शक सुचना**

१. क्रिडा स्पर्धेच्या कामासाठी,पंचाना ने-आण करण्यासाठी अधीक्षक,येरवडा मध्यवर्ती कारागृह व दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविदयालय हे वाहनाची व्यवस्था करतील.

२.ज्या कारागृहा कडे पुर्वीच्या क्रिडा स्पर्धांच्या सांघिक ढाली (शिल्ड)आहेत त्यांनी प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे-६ येथे दिनांक-२३/०३/२०२६ पर्यंत पाठविण्यात याव्यात.सदरच्या ढाली जमा करण्याची कार्यवाही प्राचार्य,प्रशिक्षण महाविदयालय यांनी करावी.

३. समितीतील सर्व पदाधिकारी दिनांक ०७/०४/२०२६रोजी सायंकाळी ४.०० वाजता खेळाडूंची ओळख करुन घेतील तसेच स्पर्धेची सर्व तयारी पुर्ण झाली आहे किंवा कसे याची पहाणी करतील.

४.सर्व समितीचे सदस्य पदाधिकारी यांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवल्यास त्यांनी कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग,येरवडा,पुणे-६यांचेशी संपर्क साधावा.

५.संचलनाच्या वेळी मुख्यालय ,दक्षिण विभाग,पश्चिम विभाग,पूर्वविभाग,मध्य विभाग,नाशिक विभाग या सहा ही संघाचे ध्वज, कारागृह विभागाचा ध्वज, तसेच नांवाचे फलक हे क्रिडांगण समिती तयार ठेवील.तसेच क्रिडा स्पर्धेत विभाग निहाय सहभागी सर्व खेळाडुंचे कपडे (किट / ट्रक सुट ) एक समान रंगाचे असावे व सहभागी खेळाडुंना कपडे (किट /ट्रक सुट ) अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी प्रादेशिक कार्यालय यांची राहिल.

६. दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता ऑकेस्ट्रा (संगिताचा कार्यक्रम)असुन तदनंतर सर्व पदाधिकारी व खेळाडू यांचे करिता सहस्नेह भोजना चा कार्यक्रम होईल.

७. क्रिडा स्पर्धे मध्ये शिस्तीचे पालन करणे हे प्रत्येक खेळाडूचे आद्य कर्तव्य आहे.मैदानावर पंचा सोबत कोणताही खेळाडू उध्दटपणे वागणार नाही,जे खेळाडू मैदानावर शिस्त पाळणार नाहीत किंवा रात्रीच्या वेळी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर राहणार नाहीत त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यांत येईल याची सर्व संघनायकव खेळाडू नोंद घेतील.

८.सर्व खेळाडू सर्व सामने खिलाडू वृत्तीने खेळतील व पंचाचे निर्णयाचे पालन करतील.

९.खेळाडूंच्या निवास स्थानाची प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगअधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा,पुणे-६ हे केव्हाही अचानक पणे पाहणी करतील. त्यावेळी सर्व खेळाडू शिस्तीत हजर राहणे आवश्यकआहे.

१०.क्रिडा स्पर्धेच्या कालावधीत सहभाग घेणारे खेडाळु कोणत्याही प्रकारचे व्यसन करणार नाही.खेळाडु व्यसन केलेले आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११.सर्व कारागृह अधीक्षकांनी राज्यस्तरीय वार्षिक क्रिडा स्पर्धे करीता पाठविण्यांत येणा-या खेळाडूंना उक्त सूचनांचे कटाक्षाने पालन करणे बाबत सूचना देण्यांत याव्यात व त्याची जबाबदारी संबंधीत कारागृह अधीक्षकांची राहील.

१२.जे अधिकारी/कर्मचारी समिती मध्ये आहेत त्यांनी त्यांच्या समिती मधील पदाधिका-यांशी तात्काळ संपर्क साधून समिती मधील नेमुन दिलेल्या कामास सुरुवात करावी व त्यांची कामे चोखपणे पार पाडावीत.

महाराष्ट्र राज्य कारागृह अधिकारी व कर्मचारी राज्यस्तरीय / विभागीय
वार्षिक **क्रीडा** स्पर्धा सन२०२५-२०२६

**पुरुष अधिकारी / कर्मचारी यांचे साठी खालील नमूद खेळांचा समावेश आहे**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **(अ)वैयक्तीक खेळ** | **(ब)सांघीक खेळ** |
|---|---|---|---|
| १ | धावणे | अ)१०० मीटर | १)व्हॉलीबॉल |
| | | ब)४०० मीटर | २) कब्बडी |
| | | क)८०० मीटर | ३) रस्सीखेच **(Tug of War)** |
| | | ड)४ X १०० मीटर | **४) बास्केटबॉल** |
| | | इ)४ X ४०० मीटर | |
| २ | थाळीफेक | | |
| ३ | भालाफेक | | |
| ४ | गोळाफेक | | |
| ५ | लांबउडी | | |
| ६ | बॅडमिंटन | एकेरी | दुहेरी |
| ७ | कराटे | वजन गट नुसार | |
| ८ | कुस्ती | वजन गट नुसार | |
| **महिला अधिकारी / कर्मचारी यांचे साठी खालील नमूद खेळांचा समावेश आहे** | | | |
| १ | धावणे | अ)१०० मीटर | १)व्हॉलीबॉल |
| | | ब)२०० मीटर | |
| | | क) ४ X१०० मीटर | |
| | | ड)४ X ४०० मीटर | |
| २ | जलद चालणे | १५०० मीटर | |
| ३ | थाळी फेक | | |
| ४ | बॅडमिंटन | एकेरी व दुहेरी | |
| ५ | गोळा फेक | | |
| ६ | लांब उडी | | |
| ७ | कराटे | वजन गट नुसार | |
| | | | |